# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ६११/पोलीस अधिक्ष,क कार्यालय भंडारा, दिनांकः- २० /११/२०१८

## ''जबरी चोरी करूण दुखापत करणाऱ्या आरोपीना सात वर्ष कारावास व द्रवदंडाची शिक्षा ''

**पोलीस ठाणे साकोली** :– आरोपी नामे १) रजनीश पुरूषोत्तम पोगडे वय २७ वर्ष रा. सेंदुरवाफा २) गोविंद किशोर सोरते वय २६ वर्ष रा. चंद्रशेखर वार्ड गोंदिया ३) मोनु रामु बोकडे वय २५ वर्ष, रा. नगपुरा मुर्री गोदिंया यांनी नरेश शंकर शेंडे वय ३५ वर्ष रा. पिंपळगाव /सडक यास चाकुने मारुन जबरी चोरी करून दुखापत केल्याचा आरोप सिध्द् झाल्याने दिनांक १९/११/२०१८ रोजी **मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा श्री. संजय देशमुख** भंडारा सा. यांनी आरोपीचे कृत्य व गुन्हयाची गंभिरता लक्षात घेवुन आरोपीस कलम ३९४ मध्ये ७ वर्ष कारावास व प्रत्येकी ५०००/–रू. दंड दंड न भरल्यास ३ महिणे कारावास व कलम ३९७ मध्ये ७ वर्ष सक्त मजुरी शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, दिनांक ११/०४/१५ ला तक्रारदार नरेश शंकर शेंडे वय ३५ वर्ष रा. पिंपळगाव /सडक यांनी पोलीस ठाणे साकोली येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, दिनांक ११/०४/२०१५ रोजी ०७:४५ च्या सुमारास आपले बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच ४० वाय ८६२३ ने दुध भरून बिलासपुर (छ.ग.)येथे जात असता रात्री ०९:०० वा. दरम्यान एस.टी.स्टॅण्ड साकोली समोरून एन.एच.६ रोडनी जात असताना एक हिरव्या रंगाची मोटर सायकलनी ट्रिपल सिट हे तक्रारदाराचे गाडीसमोर आले त्यामुळे त्याने आपले वाहन थांबविले त्यांनी संगनमत करून तक्रारदार यास जबरीने गाडी खाली ओढले लगेच त्याचा सोबतचा दुसरा आरोपी येवुन तक्रारदाराच्या खिशाची चाचपनी केली तेव्हा मी विरोध केला असता पहील्या आरोपी त्याचे जवळील चाकु काढुन चाकुने तक्रारदाराच्या उजव्या सिटवर (फेंडवर)मारून जखमी केले.व शर्टचे वरचे खिशातिल मोबाईल नोकिया कंपनीचा किमती १५००/–रू. चा जबरीने चोरून घेतला तसेच माझ्या पॅन्टच्या मागिल खिशातिल पॅकेट मधले एक आधार कार्ड ,व माझी चारचाकी वाहनाची लॉयसन्स ५००/–रू. च्या दोन नोटा व १००/–रू. चा ४ नोटा असे १४००/–रू. जबरीने घेवुन गेले असे सांगीतल्या वरुन अशी तक्रार पोलीस स्टेशन साकोली येथे दिल्यावरून अपराध क्रमाक ४९/२०१५ कलम ३९२,३९४,४०१,३४

भा.द.वी अन्वये गुन्हा नोंदवुन गुन्हयाची गांभिरता लक्षात घेवुन गुन्हयात ३९७ वाढ करण्यात आली. गुन्हयाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक गणेश खंडाते यांनी सुरू केला.

सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक गणेश खंडाते यांनी करून आरोपी नामे १) रजनीश पुरूषोत्तम पोगडे वय २७ वर्ष रा. सेंदुरवाफा २) गोविंद किशोर सोरते वय २६ वर्ष रा. चंद्रशेखर वार्ड गोंदिया ३) मोनु रामु बोकडे वय २५ वर्ष, रा.नगपुरा मुर्री गोदिंया यास अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द् गुन्हयात कलम ३९२,३९४,४०१,३४. भा.द.वी अन्वये सहायक पोलीस निरीक्षक गणेश खंडाते यांनी आरोपपत्र तयार करून सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस.क्र. ३३/१५ सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा श्री. संजय देशमुख** भंडारा सा.यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट प्रमोद के. भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले, आज दिनांक १९.११.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे १) रजनीश पुरूषोत्तम पोगडे वय २७ वर्ष रा. सेंदुरवाफा २) गोविंद किशोर सोरते वय २६ वर्ष रा. चंद्रशेखर वार्ड गोंदिया ३) मोनु रामु बोकडे वय २५ वर्ष, रा.नगपुरा मुर्री गोदिंया यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३९४ मध्ये ७ वर्ष कारावास व प्रत्येकी ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ३ महिणे कारावास तसेच कलम ३९७ मध्ये ७ वर्ष सक्त मजुरी** , अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक रामेश्वर पिपरेवार ठाणेदार साकोली यांचे मार्गदर्शनात पोलीस नायक विनोद बघेले पोलीस स्टेशन साकोली यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.


( जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उप निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.